# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

जा.क्र. ८३२/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २९/१२/२०१७

**१) संगनमत करून पैश्यासाठी विवाहितेचा शारीरीक व मानसीक छळ केल्याने गुन्हा नोंद. :—**

दिनांक ०१/०५/२०१६ ते २७/१२/२०७ चे १८.०० वाजता दरम्यान यातील आरोपी क्र.०१ ते ०५ यांनी संगनमत करून फिर्यादीस तु आपले माहेरून १,००००० /रु. आन म्हणुन फिर्यादी सोबत भांडण करून तिला शारीरीक व मानसीक छळ केल्याने, प्रगती कौटुंबीक सल्ला व मार्गदर्शन केंद्र पो. स्टे. लाखनी यांचे अहवाल व फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ४९८,(अ),३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील पोहवा. टेंभुर्णे पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत.

**२) मॅग्नीज भरण्याचे कारणावरून काठीने व लाथा बुक्याने मारून जखमी केल्याने गुन्हा नोंद. :—**

दिनांक २७/१२/२०१७ चे २२.३० ते २३.०० वाजता दरम्यान यातील जखमी सुरेश पटले हा ट्रक घेवुन डोंगरी माईन्स येथे गेला असता मॅग्नीज भरण्याचे कारणा वरून यातील आरोपी क्र. ०१ ते ०२ यांनी जखमी हा ट्रक घेवुन चिचोली येथे फॅक्ट्री मध्ये आला असता, यातील आरोपीतांनी त्यास काठीने व लाथा बुक्यांनी जखमीचे डोक्यावर व मानेवर मारून जखमी केल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम १४७,१४८,१४९,३२३ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील पोहवा. माहुर्ले पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत.

**३) महिलेचा विनयभंग केल्याने गुन्हा नोंद. . :—**

दिनांक २७/१२/२०१७ चे २१.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी ही आपले घरी एकटीच हजर असतांना यातील आरोपीने तीचे घरात प्रवेश करून तिचा हात पकडुन तिचा विनयभंग केल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम ४५१,३५४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास खंडाते पोलीस स्टेशन लाखांदुर हे करीत आहेत.

**४) अवैधरित्या रेती चोरून वाहतुक करतांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद. . :—**

दिनांक २८/१२/२०१७ चे १८.१० वाजता दरम्यान यातील आरोपीतांननी आपले ट्रॅक्टर मध्ये प्रत्येकी १०० चौरस फुट रेती कि. २०००/रु. असा एकुन ४,०००/रु. ची अवैधरित्या रेती चोरून वाहतुक करतांनी मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी महेश देवचंद वैद्य वय ३९ वर्ष रा. दिघोरी नौकरी तलाठी यांचे लेखी व जपती पंचनाम्यावरून वरून पोलीस स्टेशन दिघोरी येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. तलमले पोलीस स्टेशन दिघोरी हे करीत आहेत.

**५) अश्लिल शब्दात शिवीगाळ करून भांडण केल्याने गुन्हा नोंद. . :—**

दिनांक २८/०७/२०१७ चे १९.३० यातील आरोपी आरोपी हा फिर्यादीचे अंडयाचे दुकानात जावुन मला नास्ता दे म्हणुन भांडण करून अश्लिल शब्दात शिवीगाळ केल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २९४,५०४,५०६ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. चोपकर पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

६) क्षुल्लक कारणावरून लाकडी काठीने डोक्यावर मारून जखमी केल्याने गुन्हा नोंद. . :–

दिनांक २८/१२/२०१७ चे ०९.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी छोटाभाई गणेशभाई चव्हाण वय ८२ वर्ष यांनी घरघुती कारणावरून नात सुनेस दुस–याचे काम करता घरचे काम का करीत नाही असे फिर्यादीने बोलले असता तु कोण माझ्या पत्नीला बोलनारा असे म्हणुन यातील आरोपीने लाकडी काठीने फिर्यादीचे डोक्यावर मारून जखमी केल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३२४,५०४,५०६ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. बोरकर पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

७)शुल्लक कारणावरून लोखंडी धारधार शस्त्राने मारून जखमी केल्याने गुन्हा नोंद . :–

दिनांक २८/१२/२०१७ चे १८.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी शेषराव केशवराव साकुरे वय ३० वर्ष रा. सुभाष वार्ड शुक्रवारी भंडारा याचे घटणा तारखेच्या २ दिवसा अगोदर आरोपी यांचे सोबत रेल्वे मध्ये जागा आहे का साईड कोणती आहे या कारणा वरून शाब्दीक भांडण होवुन आरोपीने त्या गोष्टीचा मनात राग ठेवुन आज रोजी फिर्यादीस डोक्यावर लोखंडी टनक धारदार शस्त्राने मारल्याने फिर्यादीचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३२४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पो.हवा चोपकर पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

८) औषेघोउपचारा दरम्यान इसमासाचा मुत्यु. :–

दिनांक २७/१२/२०१७ चे १५.४५ वाजता दरम्यान यातील मृतक संजय लालाजी कनपटे वय ३५ वर्ष रा. रेंनगेपार हा दारू पिण्याचे सवयीचा असुन त्याने अति प्रमाणात दारूच्या प्राशन केल्याने त्याची प्रकृती खराब झाली त्यामुळे त्यास औषधोपचारा करीता सा.रू.भंडारा येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने डॉक्टरी मेमो वरून पो.स्टे. भंडारा येथे मर्ग क्र.००/२०१७ कलम १७४ जाफौ.चे कागदपत्र प्राप्त झाल्याने सर तर्फे फिर्यादी पो.शि.गभणे यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. लाखनी येथे कलम कलम १४७ प्रमाणे नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ.संतापे पो.स्टे. लाखनी हे करीत आहेत.

९) औषेघोउपचारा दरम्यान इसमासाचा मुत्यु. :–

दिनांक २७/१२/२०१७ चे १७.४५ वाजता दरम्यान यातील मृतक रघुनाथ किसन सुर्यवंशी वय ७४ वर्ष रा. देशबंधु वार्ड भंडारा हयाची दिनांक २४/१२/१७ प्रकृती खराब झाल्याने त्यास औषोधोपचारा करीता सा.रू.भंडारा येथे भरती केले असता उपचारा दरम्यान दिनांक२७/१२/१७ डॉक्टरने तपासुन मृत घोषित केल्याने डॉक्टरी मेमो वरून पो.स्टे.भंडारा येथे कलम १७४ जा.फौ.प्रामणे मर्ग क्र.००/२०१७ मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ.कन्नाके पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

९)दारू पिवुन दारूच्य नशेत वाहनचालवितांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद :–

दिनांक २८/१२/२०१७ चे १७.०० ते १७.३० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचा ताब्यातील मोटार सायकल हि दारू पिउन दारूच्या नशेत पंचायत समिती समोर पवनी येथे आमरोडवर चालवितांनी मिळुन आल्याने त्याचे वैदयकीय परीक्षणा अहवाला वरून तसेच सर तर्फे फिर्यादी पोना.रामटेके यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम १८५ मोवाका अन्वये गुन्हा नोंद पुढील तपास पोना रामटेके पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

१०) अवैध दारु /जुगार अड्डयांवर धाडी . :—

दिनांक २८/१२/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन भंडारा, जवाहरनगर,वरठी, गोबरवाही व लाखनी येथे अवैध दारू/जुगार अड्डयांवर धाडी घालुन एकुण ०८ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ४४ लटर हातभट्टी दारू + ४० किलो सडवा मोहा किंमती ४७५०/—रु. व जुगारातुन कि.२७५/रु. असा एकुन ५०२५/रु. चा माल जप्त करण्यात आला.

११) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—

दिनांक २८/१२/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ५५ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी तीन सिटर वाहनांवरती— ११ केसेस व ईतर वाहनांवरती —४४ केसेस करण्यात आलेले आहे.

(मपोउपनी. प्रणती लांजेवार)
माहिती कक्ष भंडारा
दुरध्वनी.क्र. ८८०५६५७६२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.